RNI No. MAHBIL /2009/35530
Reg. No. MH/MR/South-341/2014-16

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष ६, अंक ३१(२)] सोमवार, डिसेंबर २९, २०१४/पौष ८, शके १९३६ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ७२

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२.—महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. पृष्ठे क्रमांक १ ते २

दिनांक २४ डिसेंबर २०१४ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

राजेंद्र ग. भागवत,
प्रभारी प्रारुपकार-नि-सह सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक २९ डिसेंबर २०१४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.

१९२३ चा १. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव. १. या अधिनियमास, महाराष्ट्र करमणूक शुल्क (सुधारणा) अधिनियम, २०१४ असे म्हणावे.

१९२३ चा १. सन १९२३ चा अधिनियम क्रमांक १ याच्या कलम २ ची सुधारणा. २. महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम याच्या कलम २ मधील खंड (ब) मध्ये, सहाव्या परंतुकानंतर पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु तसेच, मालकाने स्वतः किंवा कोणत्याही सेवा पुरवठादारामार्फत सर्व करमणुकींकरिता ऑनलाईन तिकीट आरक्षण सुविधा पुरविण्यासाठी प्रति तिकीट दहा रुपयांहून किंवा राज्य शासनाकडून

राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कोणत्याही रकमेहून अधिक नसेल अशी कोणतीही रक्कम, सेवा आकार म्हणून स्वतंत्रपणे आकारलेली असेल त्या बाबतीत, मालक आणि सेवा पुरवठादार हे, दरमहा ऑनलाईन विकलेल्या तिकिटांची संख्या आणि त्याबद्दल आकारलेली ऑनलाईन इंटरनेट व्यवहार फी किंवा सुविधा आकार आणि तसेच, ऑनलाईन इंटरनेट तिकीट आरक्षण सेवा कराराच्या प्रमाणित प्रती पुढील प्रत्येक महिन्याच्या सात तारखेपूर्वी जिल्हाधिकाऱ्याला सादर करतील या शर्तीस अधीन राहून, अशा सेवा आकाराबाबतच्या अशा रकमेचा, प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमेमध्ये समावेश केला जाणार नाही, आणि ऑनलाईन तिकीट आरक्षण सुविधा पुरविण्यासाठी दहा रुपयांहून किंवा राज्य शासनाकडून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा रकमेहून अधिक असेल अशा, मालकाने स्वतः किंवा सेवा पुरवठादारामार्फत आकारलेल्या कोणत्याही स्वरुपातील सेवा आकाराच्या रकमेचा, प्रवेश मिळण्यासाठी दिलेल्या रकमेमध्ये समावेश केला जाईल.

स्पष्टीकरण.—या परंतुकाच्या प्रयोजनासाठी, "सेवा पुरवठादार" याचा अर्थ, कोणत्याही करमणुकीच्या मालकाने आपल्या संकेतस्थळावरून किंवा पोर्टलवरून किंवा इतर कोणत्याही साधनाद्वारे ऑनलाईन तिकिटे आरक्षित करण्यासाठी जिला प्राधिकृत केले असेल किंवा परवानगी दिली असेल अशी व्यक्ती किंवा कंपनी किंवा अभिकर्ता, असा आहे आणि त्यामध्ये, अशा कोणत्याही व्यक्तीचा किंवा कंपनीचा किंवा अभिकर्ता यांचा समावेश होतो.

अडचण दूर करणे.

३. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या, महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम याच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, **राजपत्रात** प्रसिध्द केलेल्या आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट करता येईल : १९२३ चा १.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG /2009/35528
Reg. No. MH/MR/South-344/2014–16

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग आठ

वर्ष ६, अंक ४७(२)] सोमवार, डिसेंबर २९, २०१४/पौष ८, शके १९३६ [पृष्ठे २, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ११८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधी व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Entertainments Duty (Amendment) Act, 2014 (Mah. Act No. XLII of 2014), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA G. BHAGWAT,
I/c. Draftsman-*cum*-Joint Secretary to Government,
Law and Judiciary Department.

MAHARASHTRA ACT No. XLII OF 2014.

(First published, after having received the assent of the Governor in the "*Maharashtra Government Gazette*", on the 29th December 2014).

An Act further to amend the Maharashtra Entertainments Duty Act.

I of 1923. WHEREAS, it is expedient further to amend the Maharashtra Entertainments Duty Act, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Sixty-fifth Year of the Republic of India as follows :–

Short title. **1.** This Act may be called the Maharashtra Entertainments Duty (Amendment) Act, 2014.

I of 1923. Amendment of section 2 of I of 1923. **2.** In section 2 of the Maharashtra Entertainments Duty Act, in clause *(b)*, after the sixth proviso, the following proviso shall be added, namely :—

"Provided also that, any payment not exceeding ten rupees or any such amount as may be specified by the State Government, from time to time, by notification in the *Official Gazette*, per ticket if charged by the proprietor himself or through any service provider towards

service charges, separately for providing facility for online ticket booking in all entertainments, in that case, such payment towards such service charges shall not be included in the payment for admission, subject to the condition that the proprietor and the service provider shall submit the data of online tickets sold per month, and online internet handling fee or convenience charges charged therefor and also the certified copies of agreement for online ticket booking services to the Collector before seventh day of every succeeding month; and any amount of such service charge in any form more than ten rupees or more than such amount as may be specified by the State Government, from time to time, by notification in the *Official Gazette*, levied by the proprietor himself or through any service provider, for providing facility for online ticket booking, shall be included in the payment for admission.

Explanation.—For the purposes of this proviso, the expression "service provider" means and includes any person or any company or agent who is authorized or permitted by the proprietor of any entertainment to book online tickets through their website or portal or by any other means.

Removal of difficulty.

3. *(1)* If any difficulty arises in giving effect to the provisions of the Maharashtra Entertainments Duty Act, as amended by this Act, the State Government may, as occasion arises, by order published in the *Official Gazette*, do anything not inconsistent with the provisions of this Act, which appears to it to be necessary or expedient for the purpose of removing such difficulty : 1 of 1923.

Provided that, no such order shall be made after the expiry of a period of two years from the date of commencement of this Act.

(2) Every order made under sub-section *(1)* shall be laid, as soon as may be, after it is made, before each House of the State Legislature.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.